जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २५ दिनांक - १०/०१/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## टोळी प्रमुख पप्पु उर्फ प्रविण अनंता येणपुरे व त्याचे इतर ०४ साथीदार यांचे विरुध्द मकोका कारवाई

दि.१०/१२/२०२३ रोजी फिर्यादी हे त्यांची पत्नी व लहान भाऊ यांचेसह कात्रज चौकाकडे कामानिमीत्त जात असतांना,जागडे यांच्या पिठाच्या गिरणीजवळ, दुगड शाळेच्या शेजारी, आंबेगाव-खुर्द,पुणे याठिकाणी आले असताना,तेथे रस्त्यावर मधोमध उभे असलेल्या पप्पू येनपुरे व त्याचे ०५ ते ०६ साथीदारांनी आपसांत संगणमत करुन,सदर परिसरात त्यांची दहशत वाढविण्यासाठी फिर्यादी यांचे दुचाकीवर लाथ मारुन,त्यांचेबरोबर वाद करण्यास सुरुवात करुन, त्यांना शिवीगाळ करुन, दगडाने व लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,गंभीर जखमी केले. तसेच तेथील गिरणी चालकास आमच्या भांडणा बाबत पोलीसांना सांगितल्यास त्यांना जीवे मारून टाकण्याची धमकी देवुन,त्यांची गिरणी बंद करावयास लावून दहशत पसरवली. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **भारती विदयापीठ पोलीस स्टेशन गु.र.नं. ७९८/२०२३ भादवि कलम ३९५,३२६,१४३,१४७,१४९,५०४,५०६(२),क्रि.ला.ॲमेन्डमेंट ॲक्ट ७** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान आरोपी नामे **१)पप्पु उर्फ प्रविण अनंता येणपुरे वय-२६ रा.सच्चाई माता नगर,आंबेगांव-खुर्द,पुणे (टोळी प्रमुख) २)गणेश तमाराम जाधव,वय १९ वर्ष,रा.अटल चाळ,कात्रज,पुणे (टोळी सदस्य) ३)अनिकेत ऊर्फ गौरव शिवाजी शेंडकर वय २१ वर्ष रा.रेणुसे चाळ,कात्रज पुणे (टोळी सदस्य) ४)यश बाळु म्हसवडे वय २० वर्ष रा.सुंदरनगर मांगडेवाडी,पुणे (टोळी सदस्य) ५)अजय सदाशिव रेणुसे वय २५ वर्ष रा.अटल चाळ,कात्रज पुणे (टोळी सदस्य) यातील आ.क्र.२ ते ५ यांना अटक करण्यात आली असुन,आ.क्र.१ हा पाहिजे आरोपी आहे.**

सदर नमुद पाहिजे आरोपी प्रविण अनंता येणपुरे (टोळी प्रमुख) याने त्याचे सह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्हयात काही सामाईक व काही नविन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले असुन त्यांनी टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायदयासाठी खुनाचा प्रयत्न,दरोडा,दरोडयाचा प्रयत्न करणे,दंगा,दुखापत करणे, गंभिर दुखापत करणे,मारामारी, बेकायदेशिर हत्यार जवळ बाळगणे,अग्नीशस्त्र जवळ बाळगणे,सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे जनमाणसात दहशत पसरविणे या सारखे गंभिर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहेत.त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केलेले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटितपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे व टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याचे हेतुने व इतर फायदयासाठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आलेने तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन. १९९९ चे कलम ३(१) (ii)३(२),३(४) प्रमाणे चा अंतर्भाव करणेकामी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड यांनी पोलीस उप-आयुक्त परि-२,पुणे शहर,श्रीमती स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांना प्रस्ताव सादर केलेला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु.र.नं.७९८/२०२३,भादवि कलम ३९५,३२६,१४३,१४७,१४९,५०४,५०६(२),क्रि.ला.अॅमेन्डमेंट अॅक्ट ७ या गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन. १९९९ चे कलम ३(१)(i) ३(२),३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगांवकर हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर,श्री.रामनाथ पोकळे,(अति.कार्यभार), मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप-आयुक्त,परि-२,पुणे शहर,श्रीमती.स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे शहर,श्री.नारायण शिरगांवकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पो.निरीक्षक श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे) श्री.विजय पुराणिक,श्री.गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक, कुलदीप व्हटकर, सहा.पो.फौज.चंद्रकांत माने, पोलीस अंमलदार,नरेंद्र महांगरे,विशाल वारुळे,स्वप्नील बांदल यांनी केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन,शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजा मध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल,यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश देण्यात आले आहेत.**त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ११३ वी कारवाई आहे.**